जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २८० दिनांक - ०५/०७/२०२४**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पोलीस कस्टडीमधून पलायन केलेल्या महिलेस हडपसर तपास पथकाने २४ तासाच्या आत छत्रपती संभाजीनगर नगर येथून केले जेरबंद

हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं. १०६८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) मधिल आरोपी नामे श्रीमती धुरपता अशोक भोसले.वय ३१ वर्षे रा.टाकळी ता.सिल्लोड जि.औरंगाबाद हिस पालखी सोहळ्या दरम्यान सोनसाखळी चोरी केल्याने तिला पकडून गुन्ह्यात दिनांक ०२.०७.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. दिनांक दि.०३/०७/२०२४ रोजी तपास कामी विश्रामबाग लॉकअप येथून नमुद महिलेला काढून हडपसर पोलीस ठाणे मध्ये आणले होते. त्यादरम्यान ती नजर चुकवुन कायदेशिर रखवालीतुन पळुन गेल्याने १०७३/२०२४ भारतीय न्यायसंहिता अधिनियम कलम २६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

दाखल गुन्ह्याचे गांभिर्य ओळखून श्री. संतोष पांढरे, वरिष्ठ पोलीस पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर यांनी नमुद महिला कायदेशिर रखवालीतुन पळून गेल्याबाबत मा.वरिष्ठांना अवगत करून नियंत्रण कक्ष पुणे येथे कळवीले होते. तपास पथक अधिकारी सहा पोलीस निरीक्षक, अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक, महेश कवळे, तपास पथक अंमलदार प्रशांत दुधाळ, निखील पवार यांनी पोलीस स्टेशन येथील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करून नमुद महिला ही कोणत्या दिशेस गेली आहे हे निश्चित केले. अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासून पळून गेलेली महिला ज्या रिक्षा मध्ये बसून गेली त्या रिक्षाचालकाचा शोध घेवून त्याचेकडे तपास करता त्याने नमुद महिलेस नोबेल हॉस्पीटल मगरपट्टा येथे सोडल्याचे सांगीतले. तेथून पुढे अधिक सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करता नमुद महिला ही मुंढवा चौका पर्यंत गेल्याचे दिसून आली. त्यामुळे नमुद महिला ही खराडी बायपास येथून तिच्या गावी जावू शकते ही शक्यता धरून तात्काळ मा.वरिष्ठांच्या परवानगीने पोलीस उप निरीक्षक, महेश कवळे, तपास पथक अंमलदार प्रशांत दुधाळ, निखील पवार महिला अंमलदार रंजना पिसे, अर्चना माने यांचे पथक छत्रपती संभजीनगर नगर येथे रवाना झाले. तपास पथक अधिकारी सहा पोलीस निरीक्षक, अर्जुन कुदळे आणि अंमलदार संदीप राठोड यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणामधून नमुद महिला ही पुणे रेल्वे स्टेशन येथे गेल्याचे निष्पन्न केले. तसेच तिच्याकडे प्रवासाकरीता पैसे नसल्याने ती पुणे रेल्वे स्टेशन ते मनमाड रेल्वे स्टेशन व तेथून छत्रपती संभजीनगर नगर कडे रेल्वेने जाईल ही शक्यता गृहीत धरून पुढे तपासाचे नियोजन केले.

छत्रपती संभाजीनगर  कडे रवाना झालेल्या तपास टिमने मनमाड रेल्वे स्टेशन व परिसर तसेच छत्रपती संभजीनगर नगर रेल्वे स्टेशन येथे नमुद महिलेचा शोध घेतला. परंतु ती मिळून आली नाही. त्यामुळे पुढील तपासाचे नियोजन करून दिनांक ०४/०७/२०२४ रोजी महिला आरोपी नामे श्रीमती धुरपता अशोक भोसले.वय-३१ वर्षे रा.टाकळी ता.सिल्लोड जि.औरंगाबाद हिस तपास पथकाने टाकळी सिल्लोड येथून ताब्यात घेतले. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक हसन मुलाणी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ श्री.आर राजा, यांचे मागदर्शनाखाली मा.सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, श्रीमती अश्विनी राख, हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.संतोष पांढरे, पोनि.(गुन्हे), श्रीमती मंगल मोढवे श्री.उमेश गित्ते, यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक महेश कवळे, पोलीस अंमलदार, सुशील लोणकर, संदीप राठोड, सचिन जाधव, जोतीबा पवार, प्रशांत दुधाळ, निखील पवार, प्रशांत टोणपे, सचिन गोरखे, अजित मदने, चंद्रकांत रेजीतवाड, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, अमोल दणके, अमित साखरे, कुंडलीक केसकर, रामदास जाधव, अमोल जाधव महिला अंमलदार रंजना पिसे, अर्चना माने यांनी केली आहे.